# प्रेस नोट

| | |
|---|---|
| युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | **आरोपी लोकसेवक क्र १.** श्री भिकाजी शेषराव घुगे, वय ५६ वर्ष, पद उपजिल्हाधिकारी, वर्ग–१ (भुसंपादन मध्यम प्रकल्प) जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा, रा. शासकीय निवासस्थान, विष्णुवाडी, बुलढाणा<br><br>**आरोपी क्रमांक २.** श्री. नागोराव महादेवराव खरात, वय ४७ वर्ष, पद अव्वल कारकुन, वर्ग–३ (भुसंपादन मध्यम प्रकल्प) जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा,रा सत्यम अपार्टमेंट, सुंदरखेड, बुलढाणा<br><br>**आरोपी क्रमांक ३.** श्री. ॲड. अनंता शिवाजीराव देशमुख, वय ३२ वर्ष, व्यवसाय खाजगी वकीली, रा. मोताळा, ता. मोताळा, जि. बुलढाणा. |
| लाच मागणी | लाचमागणी २,१७,०००/– रुपये<br>तडजोडीअंती १,००,०००/– रुपये |
| लाच स्विकारले | १,००,०००/– रुपये |
| घटनास्थळ | जिल्हाधिकारी कार्यालयाचे परीसरातील नियोजन भवनाचे बाजुला |
| घटना तारीख | २८.१२.२०२२ |

थोडक्यात हकीकत :– यातील तक्रारदार यांचे वडीलांचे नावावरील वारसाहक्काने आलेली शेती जिगांव प्रकल्पात गेलेली असल्याने सदर शेतीचा मोबदला देण्यासाठी आरोपी क्र. २ श्री. खरात लिपीक हे २,१०,०००/– रुपये लाचमागणी करीत असल्याबाबत दिनांक २६.१२.२०२२ रोजी लेखी तक्रार लाचलुचपत प्रतीबंधक विभाग बुलडाणा यांचेकडे दिली होती.

त्यानुसार दिनांक २६.१२.२०२२ रोजी लाचमागणी पडताळणी कार्यवाही आयोजीत केली असता सदर पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक खरात लिपीक यांनी तक्रारदार यांना पंच क्र १यांचे समक्ष लोकसेवक श्री घुगे उपजिल्हाधिकारी यांना लाच दयावी म्हणून अपप्रेरणा दिल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोकसेवक श्री. भिकाजी घुगे, उपजिल्हाधिकारी, भुसंपादन, मध्यम प्रकल्प, जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा यांनी पंच क्र १यांचे समक्ष तक्रारदार यांना तडजोडीअंती १,००,०००/– रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारणार असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार सदर प्रकरणात दिनांक २८.१२.२०२२ रोजी आयोजीत करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र ३ श्री. अनंता शिवाजीराव देशमुख, यांनी आरोपी क्र १. लोकसेवक भिकाजी घुगे, उपजिल्हाधिकारी यांचे सांगणेवरुन, तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम १,००,०००/– रुपये पंच क्र. १ यांचे समक्ष स्विकारली. त्यावरुन आरोपी श्री. देशमुख यांना रंगेहात पकडण्यात आले असून इतर सर्व आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन बुलडाणा शहर येथे कलम ७, ७ (A), १२ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदर कार्यवाही :– १. मा. श्री. मारोती जगताप, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
२. मा. श्री. अरुण सावंत, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
३. मा. श्री. देविदास घेवारे, अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती
४. मा. श्री. गजानन शेळके, पोलीस उपअधिक्षक, लाप्रवि. वाशिम, अतिरिक्त प्रभार लाप्रवि. बुलढाणा

Scanned with CamScanner

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री. सचिन इंगळे, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा, श्री. महेश भोसले, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. वाशिम, व सापळा पथक पोहेकॉ. विलास साखरे, पोहेकॉ. नितीन टवलारकर, नापोकॉ. जगदीश पवार, नापोकॉ. विनोद लोखंडे, नापोकॉ. प्रविण बैरागी, चालक नपोकॉ. शेख अरशिद यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.कार्यालय दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व ८४४६५२००२० तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा यांनी केले आहे

Sachin

( सचिन इंगळे )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्यरो, बुलडाणा

Scanned with CamScanner